नि.फौ.ख. क्रमांक.१३४/२०१८
सरकार विरुध्द एकनाथ व इतर
निशाणी क्रमांक –१००.

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.११</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –
माझे नांव – बबन रानबा टारपे,
वय – ४१ वर्षे धंदा – पो.हे.कॉ. ब.नं. १२३७
रा. उदगीर ग्रामीण ता. उदगीर, जि. लातूर.

<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.एन. काकडे</u>

१. दिनांक २८/०६/२०१८ रोजी मी पो.स्टे. अहमदपूर येथे कार्यरत होतो. गु.र. नं. २१९/२०१८ चा तपास माझेकडे देण्यात आला होता. तपासाकामी मला फिर्याद देण्यात आली होती. मी ३०/०६/२०१८ रोजी फिर्यादीच्या शेतात जावून घटनास्थळाचा पंचनामा (निशाणी ६७) पंचासमक्ष तयार केला. आता मला पंचनामा दाखविला त्यावर माझ्या व पंचाचा सहया आहेत, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. मी आरोपी सखाराम याच्या ताब्यातून गुन्हयात वापरलेली वस्तू कु–हाड जप्त केली. त्याबाबतचा जप्ती पंचनामा तयार केला. आता मला वरील जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी व पंचाची सही आहे.त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. जप्ती पचंनाम्याला **निशाणी क्रमांक १०१** देण्यात येते. आता जप्त वस्तू–१ दाखविली तीच कु–हाड मी जप्ती पंचनाम्याने जप्त केली होती. आरोपी वनविभागात काम करत आहेत किंवा नाहीत याबाबत वन विभागाला पत्र देवून माहिती प्राप्त केली. आता मला ती दोन पत्रे दाखविली, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पत्राना **निशाणी क्रमांक १०२ व १०३** देण्यात येतो. त्याप्रमाणे आरोपींची माहिती मिळाली. फिर्यादीचे वैदयकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व दोषारोप पत्रासोबत दाखल केले. आरोपींना अटक केली. साक्षीदारांची तपासटिपनणे नोंदविले. आरोपींनी फिर्यादीचा विनयभंग केल्याचे

निष्पन्न झाल्याने दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी न्यायालयात हजर आहेत त्यांना मी ओळखतो.

सरतपास पुर्ण

**<u>शपथेवर उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.एस.बी. काळे</u>**

२. प्रस्तूत गुन्हयातील घटना ही दि.२७/०६/२०१८ रोजी झाली होती. गुन्हयाचा तपास दि ३०/०६/२०१८ रोजी देण्यात आला. गुन्हा दाखल करण्यास विलंब का झाला त्याबाबत तपास केला नाही. घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आलेल्या शेताचा गट नंबर व त्याच्या मालकी बाबत चौकशी केली नाही. घटनास्थळावरील शेत जमीन मालकाचा जवाब नोंदविला नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरील पंच मोघा गावचे रहिवासी नाहीत. पंचाना मी बोलावलो होतो. घटनास्थळावरील पंच फिर्यादीचे नातेवाईक असल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीचे सांगण्यावरुन पंचाची निवड केली व खोटा पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा तयार करताना दोन पंच,फिर्यादी, फिर्यादीचे पती व फिर्यादीची मुले हजर होती. साक्षीदार पुंडलिक मलकापुरे याचे शेत घटनास्थळाच्या कोणत्या दिशेला आहे, हे मला सांगता येणार नाही. या गुन्हयात तपासण्यात आलेले साक्षीदार फिर्यादीचे नातेवाईक असल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला या गुन्हयाचा तपास करण्याचा कायदेशीर अधिकार नाही. आरोपींनी याच घटनेच्या दिवशी फिर्यादी विरुद्ध दाखल केलेल्या गुन्हयाची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन खोटा तपास केला व खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, खोटा जप्ती पंचना तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून कोणतीही वस्तू जप्त करण्यात आलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

नि.फौ.ख. क्रमांक.१३४/२०१८

सरकार विरुध्द एकनाथ व इतर

उलटतपास पुर्ण.

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/–

**( आर.डी. वाबळे )**

दिनांक – ३०.०६.२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, अहमदपूर.